**अहमदागर महनगरपालिका अहमदागर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ९**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २०/०२/२०१०

प्रति,
मा. ----------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ९ गुरूवार दि.२५/०२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर
महानगरपालिका.

**गुरूवार दिनांक- २५/०२ /२०१० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १०७ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००९-२०१० सालचे सुधारित व सन २०१०-२०११ सालचे मा.आयुक्त सादर करणार असलेले मुळ अंदाजपत्रक (म.न.पा.स्कुल बोर्डासह) विचारार्थ. |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ९

विषय क्रमांक :-१०७ गुरूवार दिनांक २५/०२/२०१०

ठराव क्रमांक :- १०७ गुरूवार दिनांक २५/०२/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००९-२०१०सालचे सुधारित व सन २०१०-२०११ सालचे मा.आयुक्त सादर करणार असलेले मुळ अंदाजपत्रक (म.न.पा.स्कुल बोर्डासह) विचारार्थ.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-**अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर जा.क्र.अर्थ /अंदाजपत्रक / ९७६/१० दिनांक २०/०२/२०१०

**विषय-** सन२००९-२०१०चे सुधारित व सन २०१०-२०११चे मुळ अंदाजपत्रक सादर करणेबाबत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २००९-२०१० चे सुधारित व सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रक सादर करावयाचे असल्याने दिनांक २४/०२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता या प्रयोजनासाठी मा.स्थायी समिती सभा बोलविण्यांत यावी ही विनंती.

येणे प्रमाणे मा.आयुक्त श्री. संजय काकडे साहेब यांचे पत्र

--**--

मा.स्थायी समितीची अंदाजपत्रकीय सभा क्रमांक९ गुरूवार दिनांक २५/०२/२०१०रोजी बोलावलेली व पुढे मंगळवार दिनांक०२/०३/२०१०,बुधवार दि.०३/०३/२०१०,गुरूवार दि.४/०३/२०१० व शुक्रवार दि.०५/०३/२०१०रोजी चालू असलेल्या अंदाजपत्रकीय सभेमध्ये मा.स्थायी समिती सदस्य यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या व त्यांची मते मांडली.

मा.सौ.ढोणे मा.सु.:-मा.आयुक्त साहेब यांनी महानगरपालिकेचे घरपट्टी,पाणी पट्टी चे थकीत वसुली संबंधात मोहिम सुरू करून जी धडाडी दाखविली त्यामुळे महानगरपालिकेची ब-याच वर्षापासूनची थकबाकी वसुल करून त्यांनी पालिकेच्या खजिन्यात भर टाकली आहे.त्या बध्दल दूर दृष्टी असलेल्या मा.आयुक्त श्री. संजय काकडे साहेब यांचे अभिनंदनाचा विषय घेवुन ठराव करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- मा.आयुक्त श्री. संजय काकडे साहेब यांनी मालमत्ता कराचे वसुली कामी मोहिम राबवून जी धडाडी दाखविली त्यामुळे महानगरपालिकेची या महिन्यामध्ये रूपये नऊ ते दहा कोटीची वसुली झाली आहे. त्या त्याबध्दल मा.स्थायी समिती सदस्याचे वतीने मी त्यांचे अभिनंदन करतो. तसेच सदरची वसुली मोहिम या पुढे ही सुरू ठेवण्यात यावी.

मा.सौ. ढोणे मा.सु. व मा.श्री. लोंढे शि.बा.:- मा.नगरसेवक, सर्व पक्षांचे पुढारी,पदाधिकारी तसेच इतर नागरिक आणि संस्था यांचेमार्फत शहरामध्ये निरनिराळया कारणांसाठी अभिनंदनाचे, जाहिरातीचे अनधिकृत बोर्ड लावले जातात त्या अनधिकृत बोर्ड बाबत कडक धोरण अवलंबुन संबंधीताकडून दंडासह जाहिरातकराची वसुली करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- दिनांक ०१/०४/२०१०पासून अनधिकृत जाहिरात बोर्डावर दंडासह जाहिरात कर वसुलीचे कडक धोरण अवलंबण्यात यावे कारवाई कडक करण्यांत यावी.

मा.श्री.पवार बा.रे. :- महानगरपालिका हद्दीत आयात होणा-या मालावर आकारणेत येत असलेली जकात दिनांक ०१/०४/२०१०पासून बंद होणार असलेने जकात कर / स्थानिक संस्था कर या लेखाशिर्षामधील "स्थानिक संस्था कर" हे लेखाशिर्षा स्वतंत्र तयार करून त्यावर रक्कम रूपये एक हजार फक्तची टोकण तरतुद करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-"वर्कशॉप स्थलांतर व विकसीत करणे" या लेखाशिर्षावर रूपये दहा लाखाची तरतुद करण्यांत आलेली आहे. सदरचे म.न.पा.चे गॅरेज दातरंगे मळा येथील महानगरपालिकेचे मालकीचे जागेवर विकसीत करण्यांत यावे.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- केडगांव पाणी पुरवठा योजना पुर्ण झाले नंतर टॅन्करद्वारे पाणी पुरवठा करणेचा खर्च वाचणार असलेने पाणी पुरवठा विभाग खर्च बाजूचे "टॅन्करद्वारे पाणी पुरवठा करणे" या लेखाशिर्षावर असलेली तरतुद रूपये एक कोटी वीस लाखाचे ऐवजी रूपये ऐंशी लाख करण्यांत यावी. तसेच महानगरपालिका हद्दीबाहेर म.न.पा. मार्फत पुरवठा केलेल्या पाणी पट्टी कराची रक्कम संबंधीत व्यक्ति, संस्थाकडून वसुली करण्यांत यावी.

मा.श्री.गव्हाळे वि.ना.:-महानगरपालिका हद्दीतील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेचे हॅड्रोलिक व्यावस्थापन करणे साठी "पाणी पुरवठा सर्व्हेक्षण करणे / पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे हैड्रॉलिक व्यवस्थापन करणे" या लेखाशिर्षावर असलेली तरतुद रूपये नउ लाखाने वाढवून ती रूपये दहा लाख अशी करणेत यावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- महानगरपालिकेचे वाढीव हद्दीतील उपनगरामधील वस्ती वाढती असल्याने त्या भागात पाणीपुरवठा करणेसाठी "वाढीव हद्दीत नवीन पाईप लाईन टाकणे" या लेखाशिर्षावर असलेली तरतुद प्राधान्याने वाढविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- "शहरात नविन पाईप लाईन टाकणे" या लेखाशिर्षावर केलेली तरतुद कमी करून रूपये पंचवीस लाख ठेवावी व "वाढीव हद्दीत पाईप लाईन टाकणे" या लेखाशिर्षावरील तरतुद वाढवून रूपये पन्नास लाख अशी करण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कार पो.ज. :- पाण्याची टाकी बांधणेची कामे म.न.पा. फंडातून करणेत येणार नसलेने "पाण्याचे टाकी बांधणे" या लेखाशिर्षावर असलेली तरतुद,कमी करून रूपये एक लाख फक्त ठेवण्यांत यावी.

मा.श्री.कांबळे र.द. व मा.श्री. लोंढे शि.बा.:- नगररचना विभागामार्फत मंजूर केलेल्या रेखांकना मधील ओपनस्पेस या नागरिकांचे दृष्टीने गैर सोईच्या होतील अशा ठेवण्यात येवु नयेत. हाय टेन्शनच्या विद्युत लाईन जेथुन जातात अशा जागी ओपन स्पेस ठेवण्यात येवु नयेत.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:-महानगरपालिकेचे कर्मचा-यासाठी अपघात विमा योजना लागु करावी त्याकरिता नवीन लेखाशिर्ष तयार करून त्यावर रूपये दोन लाख फक्त अशी तरतुद करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-महानगरपालिकेचे सर्व विभागाचे संगणकीकरण करणेकरिता "नवीन संगणक खरेदी (सर्व विभाग)" या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये पांच लाखाने वाढवून रूपये तीस लाख करण्यांत यावी व लेखाशिर्षाचे नाव "संगणक खरेदी (सर्व विभाग ) ई-गव्हर्नन्स" असे करण्यांत यावे. त्याचप्रमाणे "स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र खर्च " या लेखाशिर्षावरील तरतुद वाढवून रूपये पांच लाख फक्त अशी करण्यांत यावी. व "महानगरपालिका पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी प्रशिक्षण" या लेखाशिर्षावरील तरतुद कमी करून रूपये पांच लाख फक्त अशी ठेवण्यांत यावी.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:-आगामी वर्षापासून जकात वसुली बंद होणार असल्याने जकात विभागा करिताचे "नाकाभाडे, बांधकाम, दुरूस्ती व स्थलांतर" या लेखाशिर्षावर असलेली रूपये पंधरा लाखाची तरतुद कमी करून रूपये पांच लाख फक्त अशी तरतुद ठेवणेत यावी.

मा.श्री.गव्हाळे वि.ना. :- मालमत्ता पुर्नमुल्यांकन करणे करिताचे खर्चासाठी रूपये एक हजार फक्त अशी तरतुद दाखविलेली आहे.मालमत्ता पुर्नमुल्यांकनाचे काम खाजगी अभिकर्त्या मार्फत करणेचे धोरण असल्याने मालमत्ता पुर्नमुल्यांकनासाठी रूपये एक हजार ऐवजी रूपये दहा लाख फक्त अशी तरतुद ठेवण्यांत यावी. मालमत्ताचे पुर्नमुल्यांकनातुन मालमत्ताकराचे कोटयावधीचे रूपयांचे उत्पन्न वाढेल.

मा.श्री.गव्हाळे वि.ना. व मा.श्री. पवार बा.रे.:-महानगरपालिकेमार्फत राबविण्यांत येणा-या "मिळकत धारक आरोग्य विमा योजना "या योजने ची माहिती नागरिकांना होईल या करिता सदर योजनेची प्रसिध्दी जाहिर रित्या करण्यांत यावी. त्यामुळे महानगरपालिकेचे मिळकत कराचा भरणा निश्चित वाढेल. तसेच "संपर्क व प्रसिध्दी " या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये एक लाखाने वाढविण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- पाणी पुरवठा विभाग व अग्निशमन विभागाकरिता कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणेचे पदांना मा.शासनाची मंजूरी मिळणे करीता करावयाचे आवश्यक प्रस्ताव तयार करणेत यावेत व मा. शासनाकडेस मंजूरी करिता पाठविणेची कार्यवाही करणेत यावी.

मा.श्री.पवार द.ज. व मा.सभापती साहेब :- अग्निशमन विभागाकरिता एक अत्याधुनिक फायर फायटर वाहन खरेदी करण्यांत यावे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- "उनाड कुत्री बंदोबस्त करणे व दंशावर उपचार करणे" या लेखाशिर्षावरील तरतुद कमी करून रूपये वीस लाख ठेवण्यात यावी. तसेच "श्वान दंशावर लस खरेदी" या लेखाशिर्षावरील तरतुद कमी करून ती रूपये पांच लाख ठेवण्यात यावी. महानगरपालिका हद्दीतील रोगट कुत्र्यावर उपचार करणेत यावेत.

मा.श्री. पवार बा.रे. :- विद्युत साहित्य खरेदी या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये पंधरा लाखाने वाढवून ती रूपये पस्तीस लाख फक्त अशी करण्यांत यावी. सदर निधी प्रत्येक वॉर्डाकरिता सम प्रमाणात वाटप करून त्या प्रमाणे खर्च करण्यात यावा.

मा.सौ. ढवण शा. दि. :- यशोदानगर भागामध्ये स्ट्रीट लाईट फिटींगचे आवश्यक कामासाठी तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- केडगांव ते सातपुते वस्ती पर्यत वीजचे नवीन खांब टाकणे व त्यावर सोडीयम व्हेपर दिवे बसविणेचे काम करणे गरजेचे आहे.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- "१५० वॅट सोडियम व्हेपर पोल टाकणे / उर्जा बचत दिवे बसविणे" या लेखाशिर्षावरील तरतुद वाढवून ती रूपये पंचवीस लाख अशी करण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- "नवीन इले. पोल स्ट्रीट लाईट स्पॅन फिटींग" या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये पंधरा लाखाने वाढवून ती रूपये पंचवीस लाख फक्त अशी करण्यांत यावी. तसेच "जुने पोल हलविणे " या लेखाशिर्षावरील तरतुद वाढवून ती रूपये पंधरा लाख फक्त अशी करण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- "रस्ते व इमारती वरील वीज बील" या लेखाशिर्षावरील रूपये एक कोटी सत्तर लाखाची केलेली तरतुद रूपये वीस लाखांनी कमी करून ती रूपये एक कोटी पन्नास लाख फक्त अशी ठेवण्यांत यावी व "विद्युत बचत प्रकल्प राबविणे" या लेखाशिर्षावरील तरतुद वाढवून ती रूपये वीस लाख फक्त अशी करण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- कचरा वाहतुकीसाठी खरेदी केलेले कंन्टेनर्स कचरा वाहतुकी साठी अडचणीचे असल्याने त्यामधून कचरा व्यवस्थीत बाहेर पडत नसल्याने ते बदलून घ्यावेत.कचरा वाहतुकासाठी जादा कंन्टेनरची खरेदी करण्यांत यावी

मा.सभापती साहेब :- कचराडेपो करिता जागा खरेदी तसेच ट्रान्स्फर स्टेशन विकसीत करणे बाबत कार्यवाही करण्यांत यावी. तसेच "कंन्टेनर, कॉम्पॅक्टर, इंपर प्लेसर इत्यादी खरेदी" या लेखाशिर्षावर केलेली रूपये दहा लाखाची तरतुद कमी करून ती रूपये पांच लाख फक्त अशी ठेवण्यात यावी. कंन्टेनरची खरेदी करण्यांत यावी. व "नवीन जेटींग मशिन खरेदी" या लेखाशिर्षावरील तरतुद वाढवून रूपये वीस लाख फक्त अशी करण्यांत यावी. "हायप्रेशर युनिट खरेदी" या लेखाशिर्षावरील तरतुद वाढवून रूपये पंधरा लाख फक्त अशी करण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. व मा.श्री. लोंढे शि.बा. :- सावेडी, केडगांव, मुकुंदनगर इत्यादी उपनगराकरिता प्रत्येकी एक शववाहिनी घेणेची तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- "जेंडर बजेट महिला व बाल कल्याण कार्यक्रम खर्च ५%" या लेखाशिर्षावरील तरतुद कमी करून रूपये पन्नास लाख फक्त अशी करणेस मंजूरी देण्यांत यावी. उपनगरासाठी शववाहिनी खरेदी कामी आवश्यक ती तरतुद करण्यांत यावी. रूपये पांच लाखाची तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- महानगरपालिकेचे एक अत्याधुनिक हॉस्पीटल बांधण्यात यावे.

मा.श्री. कांबळे र.द. :- केडगाव भागातील महिलांना प्रसुतीसाठी हॉस्पीटलला जाण्यासाठी रात्री अपरात्री वेळेवर रिक्षा वैगरे वाहने मिळत नाहीत. त्या करिता केडगाव भागाकरिता एका रूग्ण वाहिकेची तरतुद करण्यात यावी. तसेच केडगांव उपनगराची लोकसंख्या साठ हजार असून ती लोकसंख्या दिवसेंदिवस वाढते आहे. तेथील गरीब लोकांकरिता सर्व सोई सुविधांनी युक्त असे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करावे. त्याकरिता अर्थसंकल्पामध्ये तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेबः-महानगरपालिका "म.न.पा.रक्तपेढीसाठी औषधे व उपकरणे खरेदी"या लेखाशिर्षा वरील तरतुद जादा असल्याने ती रूपये पांच लाखाने कमी करून रूपये सद्तीस लाख फक्त अशी ठेवण्यात यावी."रक्तपेढी वैद्यकिय अधिकारी व तंत्रज्ञ यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे"या लेखाशिर्षावर रूपये पांच लाखाची तरतुद करण्यांत यावी.तसेच "मशिनरी खरेदी दुरूस्ती (रक्तपेढी)"या लेखाशिर्षावर रूपये पन्नास हजार फक्त अशी तरतदु करण्यांत यावी.

मा.श्रीमती गंभीर इं. कि. :- उपनगरामध्ये तसेच शहरामध्ये उदिर घुसीचे प्रमाण बरेच वाढलेले असून त्यामुळे नागरिकाचे मालमत्तेचे नुकसान होते. उंदिर घुसीचे बंदोबस्तासाठी त्यांचे प्रतिबंधासाठी "पिंजरे खरेदी (उंदिर /घुस प्रतिबंधक)" या लेखाशिर्षावरील तरतुद वाढवून ती रूपये एक लाख ठेवण्यांत यावी. उंदिर / घुस बंदोबस्त करावा.

मा.श्री.भोसले ग.पुं.:-"जंतुनाशक द्रव्ये खरेदी"या लेखाशिर्षावर असलेली तरतुदी जादा असलेने "जंतुनाशक द्रव्ये खरेदी"या लेखाशिर्षावरील तरतुद कमी करून रूपये दहा लाख ठेवण्यात यावी.

मा.श्री.पवार बा.रे. व मा.श्री.बारस्कर पो.ज.:- नवीन हद्दवाढी मधील सावेडी, बोल्हेगांव या उपनगरासाठी सावेडी भागात स्मशानभूमी विकसीत करणे करिता "स्मशानभूमि सुधारणा व नवीन स्मशानभूमी" या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये पंचवीस लाखाने वाढवून रूपये पस्तीस लाख फक्त अशी करण्यांत यावी.

मा.श्री. कांबळे र.द.:- "वृक्षारोपन, वृक्ष संरक्षण व ट्री गार्ड खरेदी" या लेखाशिर्षावर असलेली तरतुद वाढवून ती रूपये दहा लाख फक्त अशी करण्यांत यावी. "वृक्षगणना व नंबर टाकणे" या लेखाशिर्षावरील तरतुद वाढवून रूपये दोन लाख फक्त अशी करण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- बुरूडगाव रोड भागातील रस्त्यांचे पॅचिंगची तसेच मजबुतीकरणाची कामे प्राधान्याने करण्यांत यावीत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- पाईप लाईन रोड, तपोवन रोड, पिंपळगांव रोड, गुलमोहर रोड,बोल्हेगांव फाटा, गांधीनगर फाटा ते गांधीनगर, पाईप लाईन रोड ते वडगांवगुप्ता रोड, पवननगर रोड ते पिंपळगाव रोड पर्यत, सावेडी ते बोल्हेगांव रोड, भिडे हॉस्पीटल ते ओंकार कॉलनी ते सोनानगर रोड ते प्रेमदान ते डैाले हॉस्पीटल हे रस्ते ४० ते ५०,६० व ८० फुट रूंदीचे आहेत या रस्त्यांचे कामांसाठी अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतुद करण्यांत यावी.

मा.सौ.ढवण शा.दि. :- (१) पाईप लाईन रोड ते कांदबरी फेज-२ , आरोह, निसर्ग ते पाईप लाईन रोड (२) गावडे मळा ते राजनगर रस्ता (३) इंद्रायणी हॉटेल ते कॉटेज कॉर्नर हा तपोवन रोड या रस्त्याचे डांबरीकरण करण्यांत यावे. तसेच वरवडे वस्ती, वरवडे वस्ती ते पाईप लाईन रोड या रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्यांत यावे. त्या करिता आवश्यक तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- (१)आदर्शनगर वसाहती कडे जाणा-या अरणगांव रोड ते आदर्शनगर या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणासाठी रूपये वीस लाखाची तरतुद करण्यांत यावी.(२) गजानन नगर, खंडोबानगर, घेबुड वस्ती, ठुबे वस्ती या परिसरातील रस्त्याचे डांबरीकरणासाठी रूपये पंधरा लाखाची तरतुद करण्यांत यावी. (३) सुशांतनगर परिसरातील रासनेनगर, चौधरीनगर परिसरातील उंच रस्ता मुळ पदावर आणने साठी खोदई कामासह रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी रूपये दहा लाखाची तरतुद करण्यांत यावी. (४) अरणगाव ते आदर्शनगर रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी रूपये पंचवीस लाखाची तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री.कांबळे र.द.:- महानगरपालिकेचे कर्मचा-याचे निवासस्थान असलेली त्रिदल इमारत, विळद कर्मचारी वसाहत, जिजामाता उदयानातील इमारत या इमारतीची प्राध्यान्याने दुरूस्ती करण्यात यावी. "इमारत दुरूस्ती" या लेखाशिर्षावरील तरतुद आवश्यकते प्रमाणे वाढविण्यांत यावी. "महानगरपालिका सभागृह नुतनीकरण" या लेखाशिर्षावर रूपये दहा हजार फक्त अशी तरतुद ठेवण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- "नवीन प्रशासकीय इमारत सुरक्षा व्यवस्था" तरतुद कमी करून रूपये दोन लाख फक्त अशी करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-"रस्ते कॉक्रीटीकरण"या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये दहा लाखाने वाढवून ती रूपये पस्तीस लाख फक्त करण्यांत यावी व "रस्ते डांबरीकरण व नुतनीकरण"या लेखाशिर्षा वरील तरतुद रूपये पंचवीस लाखाने वाढवून रूपये एक कोटी व "रस्ते मजुबतीकरण"या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये पंचवीस लाखाने कमी करून रूपये पन्नास लाख अशी ठेवण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- सार्वजनिक बांधकाम विभागाचे खर्च बाजूचे अंदाजपत्रकामधील लेखाशिर्षावर असणारी तरतुद ही लेखाशिर्षातंर्गत करण्यांत येणा-या कामांसाठीच वापरण्यांत यावी. तसेच आकस्मीक खर्चासाठी केलेली तरतुद ही अचानक उद्भवना-या नैसर्गिंक आपत्तीचे वेळीच खर्च करण्यांत यावी.

मा.श्री.गव्हाळे वि.ना. :- सिना नदी सुशोभिकरणाचे कामामध्ये सीना नदीवर पुल बांधणेचे कामाचाही समावेश करण्यांत यावा.

मा.श्री. कांबळे र.द. :- "जे.सी.बी. भाडयाने लावणे" करिता ठेवण्यात आलेली तरतुद वाढवून रूपये तीन लाख करण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- "शालेय क्रिडा स्पर्धा भरविणे" या लेखाशिर्षावर करण्यांत आलेली तरतुद वाढवून रूपये दोन लाख फक्त अशी करण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- "महानगरपालिका वर्धापन दिन साजरा करणे" या लेखाशिर्षावर असलेली तरतुद कमी करून ती रूपये एक लाख पन्नास हजार फक्त अशी ठेवण्यात यावी.

मा.सौ.ढवण शा.दि.:- पाईप लाईन हडको मधील ओपन स्पेसमध्ये गार्डन करावे तसेच पद्मानगर येथील ओपन स्पेसला कंपौन्ड वॉलचे बांधकाम करावे. पाईप लाईन हडको व यशादेनगर, नम्रता कॉलनी,स्वामीनगर येथील ओपनस्पेसमध्ये लहान मुलांसाठी खेळणी व जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बाकडे इत्यादीची सुविधा करण्यांत यावी. त्याकरिता आवश्यकती तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री.बारस्कर पो.ज. :- सारसनगर, मुंकुदनगर, बोल्हेगांव, केडगाव या उपनगरामध्ये उद्याने विकसित करणेसाठी "उद्यान विकास व तार कंपौन्ड" या लेखाशिर्षावर एकूण रूपये वीस लाखाची तरतुद करण्यांत यावी. त्यामधून ओपन स्पेसचे जागांना तार कंपौन्ड करण्यात यावे त्यांचा उद्यान म्हणून विकास करण्यांत यावा.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- प्रभाग क्रमांक ६३ मधील मयुरीनगर किंवा आदर्शनगर मधील ओपन स्पेसवर उद्यान विकसीत करण्यांत यावे. तसेच केडगाव सोनेवाडी लगत असलेल्या महानगरपालिकेचे जागेत व प्रभागातील इतर ओपन स्पेसवर अतिक्रमणे वाढत असल्याने भविष्यात जागा गिळंकृत होण्याची शक्यता असल्याने सदरचे मोकळया जागेवर उद्यान विकसीत करावे. त्यासाठी भरीव तरतुद करावी. सुशांतनगर येथे महिला जीम व कांबळे वस्ती येथे व्यायाम शाळा व समाज मंदिराचे काम करण्यांत यावे. सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर संडासला बसणारांवर दंडात्मक कारवाई करावी.

मा.सभापती साहेब :- रेखाकंनामधील ओपन स्पेसचा वापर सार्वजनिक असल्याने खेळाडू साठी ओपन स्पेसचा वापर खेळाची मैदाने म्हणून करण्यांत यावा. शहरात व उपनगरात खेळाची मैदाने विकसीत करावीत त्यासाठी "क्रिडांगण विकसीत करणे" या लेखाशिर्षावर असलेली तरतुद रूपये नउ्र लाखाने वाढवून रूपये दहा लाख अशी करण्यांत यावी.

मा.सौ.ढवण शा.दि. :- ढवण वस्ती येथील ओपन स्पेस मध्ये व्यायाम शाळा करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- "नवीन प्रशासकीय इमारत" या लेखाशिर्षावरील तरतुद कमी करून ती रूपये एक लाख फक्त अशी ठेवण्यात यावी

मा.श्री.गव्हाळे वि.ना. व मा.श्री.बारस्कर पो.ज. :- रेखांकना अंतर्गत सुधारणेची कामे ही महानगर पालिकेचे सुपरव्हिजन खाली करण्यांत यावीत. विकास भार निधी ची तरतुद ही त्याच भागामध्ये खर्च करण्यांत यावी.

मा.श्री.कंाबळे र.द. व मा.श्री. पवार बा.रे. :- प्रशासनाचा विरोध असला तरी मा. सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी दोन टक्के ऐवजी पंधरा टक्के प्रमाणे ठेवण्यांत यावा. तसेच मा. महापौर शहर विकास निधी, मा. उपमहापौर शहर विकास निधी, मा.स्थायी समिती,सभापती शहर विकास निधी या लेखाशिर्षावर ही भरीव तरतुद करण्यांत यावी. मा.महापौर शहर विकास निधी मागिल वर्षी पेक्षा पन्नास लाखाने वाढवून तो रूपये दोन कोटी पन्नास लाख असा ठेवण्यांत यावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. व मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मा. सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी दोन टक्के ऐवजी पंधरा टक्के प्रमाणे ठेवण्यात यावा.

मा.सौ.ढोणे मा.सु. व मा.श्री. पंजाबी ज.नि. :- मा. सदस्यांची वॉर्डामधील आवश्यक कामे मागणी करूनही वेळेवर होत नाहीत. मा.नगरसेवकाचे वॉर्डामधील ऐच्छिक विकास कामासाठी असलेला "मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी" ठेवण्यास प्रशासनाचा विरोधी असला तरी तो निधी वाढविण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- "मा. महापौर शहर विकास निधी" या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये दोन कोटी पन्नास लाख या प्रमाणे ठेवण्यात यावी."मा.उपमहापौर शहर विकास निधी" या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये पंचवीस लाख व मा.स्थायी समिती ,सभापती शहर विकास निधी तरतुद रूपये पंचवीस लाख याप्रमाणे सर्वानुमते ठेवण्यांत यावी. तसेच "मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी (दोन टक्के)" या लेखाशिर्षावरील तरतुद दोन टक्के प्रमाणेच ठेवण्यांत यावी व मा.नगरसेवकांचे वॉर्डमधील ऐच्छिक विकास कामांसाठी "वॉर्ड विकास निधी" या प्रमाणे नवीन लेखाशिर्ष तयार करून त्यावर रूपये सात कोटीची तरतुद करण्यांत यावी. वॉर्ड विकास निधी हा सर्व वॉर्ड मध्ये सम प्रमाणात संबंधीत नगरसेवकांचे संम्मतीने खर्च करण्यांत यावा. सदरचे निधी करिता मालमत्ताकर व पाणी पट्टी कराचे जमा बाजू कडेस जादा तरतुद वाढवून धरण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे.: "प्रभाग समिती क्रमांक एक" चे लेखाशिर्षावर रूपये दोन लाख फक्त ची तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- डॉ. बाबासाहेब आंबडेकर व महात्मा ज्योतीराव फुले यांचे पूर्णाकृती पुतळे उभारणेची कार्यवाही करण्यांत यावी.

मा.श्री. कांबळे र.द. व मा.श्री.पवार द.ज. :- अमरधाम स्मशान भुमी मध्ये कार्यक्रमाचे वेळी नेहमीच गर्दी होते. त्याकरिता अमरधाम स्मशान भूमिसाठी नेप्ती नाक्याचे शेजारी दुसरे प्रवेशद्वार विकास करण्यात यावे. तसेच सदर कमासाठी रूपये पांच लाखाची तरतुद करण्यात यावी व त्यामधून प्रवेशद्वाराचे काम आवश्यक पेव्हिंगचे काम, तसेच पाण्याचे टाकीची व जाळयांची दुरूस्ती इत्यादी कामे करण्यांत यावीत.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- अमरधाम स्मशानभूमिचे सुशोभिकरण करण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- मुकुंदनगर हा भाग विकसीत झालेला असून तेथे भाजी मंडई नसलेने नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. त्याकरिता मुकुंदनगर भागामध्ये भाजी मंडईचे काम करण्यांत यावे आवश्यक तरतुद करावी.

मा.श्री.गव्हाळे वि.ना.:-महानगरपालिकेचे सर्व शाळामध्ये ए.व्ही.रूम करणेसाठी "ए.व्ही.रूम"या लेखाशिर्षावर असलेली तरतुद वाढूवन ती रूपये एक लाख पन्नास हजार फक्त अशी करण्यांत यावी.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:-"गणवेश खरेदी"या लेखाशिर्षावर जादा तरतुद केलेली असल्याने"शालेय गणवेश खरेदी"या लेखाशिर्षावर रूपये पांच लाख पन्नास हजार फक्त अशी तरतुद ठेवण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- आपले महानगरपालिका हद्दीमध्ये म.न.पा.च्या बालवाडया सुरू करणे करिता पहाणी (सर्व्हेक्षण) करून नवीन बालवाडया सुरू करणे विषयी कार्यवाही करण्यांत यावी.

मा.श्री.कांबळे र.द.:- महानगरपालिकेच्या ब-याच शाळा नादुरूस्त असल्याने सार्वजनिक शिक्षण "कार्यालय / शाळा दुरूस्ती" या लेखाशिर्षावरील तरतुद वाढवून ती रूपये दहा लाख फक्त अशी करण्यात यावी. महानगरपालिकेचे शाळांचा चेहरा मोहरा सुशोभित करावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. व मा.श्री. कांबळे र.द. :- महानगरपालिका शिक्षण मंडळ "वाहन खर्च" या लेखाशिर्षावरील तरतुद कमी करून रूपये एक लाख नव्वद हजार फक्त अशी ठेवण्यात यावी. म.न.पा. शिक्षण मंडळाचे खर्च बाजू कडील खर्च तरतुदी या जादा असल्याने त्या कमी कराव्यात "शिक्षण मंडळ वर्गणी" या लेखाशिर्षावर रूपये एक कोटी पंचेचाळीस लाख फक्त, "बेंच फर्निचर खरेदी व दुरूस्ती" या लेखाशिर्षावर रूपये पन्नास हजार फक्त, "बालवाडी सेविका मानधन" या लेखाशिर्षावर रूपये नव्वद हजार फक्त व "सदस्य मिटींग भत्ता मानधन" या लेखाशिर्षावर रूपये बत्तीस हजार फक्त व "म.न.पा. शिक्षळ मंडळ शिष्यवृत्ती योजना" या लेखाशिर्षावर रूपये पन्नास हजार या प्रमाणे तरतुदी करण्यांत याव्यात.

मा.श्री.गव्हाळे वि.ना. व मा.श्री. कांबळे र.द.:- महानगरपालिकेचे शाळामधील विद्यार्थीच्या क्रीडा स्पर्धा मोठया प्रमाणावर भरविण्यात याव्यात.

मा.श्री. बारस्कार पो.ज. :- "शहर वाहतुक सुधारणा " या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये चार लाखाने कमी करून रूपये तीन लाख फक्त अशी ठेवण्यांत यावी. तसेच "हत्यारे व अवजारे खरेदी" या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये दोन लाखाने वाढवून रूपये चार लाख अशी करण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. व मा.श्री. कांबळे र.द.:- महानगरपालिकेचे हद्दी मधील रस्त्यावर पडलेल्या बांधकाम मटेरिअल, रॅबीट, इत्यादी बाबत आरोग्य विभागाकडील केअर टेकर, सॅनिटरी इन्स्पेक्टर यांनी बांधकाम विभागाकडेस रिपोर्ट पाठविणेत यावा. तयाकरिता आरोग्याधिकारी यांनी संबंधीतास तसे आदेश द्यावेत. तसेच बांधकाम विभागाने रस्त्यावर पडलेल्या बांधकाम मटेरिअल व रॅबीट टाकणा-या वर मटेरिअल जप्त करून दंडात्मक कारवाई करावी.

मा.सभापती साहेब :- अतिक्रमण विभागाकरिता त्यांचे मागणी प्रमाणे एक ४०७ किंवा ४०९ चा टाटा टेम्पो घेणेत यावा.

मा.श्री. शेंडगे सं.छ. :- प्रभाग अधिकारी यांचे अधिकारात रूपये पांच हजार रकमेपर्यत मंजूर करणेत येत असलेल्या प्रभागामधील दुरूस्तीची कामे करतांना प्रभाग अधिकारी यांनी संबंधीत वॉर्डचे नगरसेवकांस विश्वासात घेवुन सदर कामे करण्यांत यावीत.

मा.सभापती साहेब :- गोविंदपुरा भागातील शितल कॉलनी, पठाण कॉलनी, वाबळे कॉलनी, येथील भागात पावसाचे पाणी घरामध्ये घुसते पावसाचे पाणी घरात घुसू नये. यासाठी ते पाणी मिलट्री एरिया मधून भिंगार नाल्यामध्ये सोडण्यांत यावे.सदरचे कामासाठी भरीव तरतुद करण्यांत यावी.

मा.सौ.ढवण शा.दि.:- नम्रता कॉलनी ते भिंगारदिवे घरापर्यत तसेच साईनगर ते वरवडे वस्ती पटांगणापर्यत भुयारी गटर्सचे काम करण्यांत यावे. तसेच राजनगर ते ढवण वस्ती येथील ड्रेनेज लाईनचे कामे करण्यांत यावीत. तसेच सदर कामासाठी आवश्यक ती तरतुद करण्यांत यावी.

मा.श्री.लोंढे शि.बा.:- प्रभाग क्रमांक ६३ मधील दूधसागर कॉलनी मध्ये गटरचे काम करण्यांत यावे. तसेच केडगावं अमरधाम जवळ नागरिकांचे सोई करिता सार्वजनिक संडासचे बांधकाम करण्यांत यावे.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- बुरूडगांव रोड बुरूडगांव आखाडा भागामधील गटारीचे कामासाठी रूपये दहा लाखाची तरतुद करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- "नवीन गटर" या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये दहा लाखाने वाढवून ती रूपये पस्तीस लाख फक्त अशी करण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- "गमबुट मास्क खरेदी " या लेखाशिर्षावरील तरतुद कमी करून रूपये एक लाख फक्त अशी ठेवण्यांत यावा.

मा.श्री. पवार द.ज. :- "गटर्स दुरूस्ती व ड्रेनेज दुरूस्ती" या दोनही लेखाशिर्षावरील तरतुदी प्रत्येकी रूपये पंचवीस लाखाने कमी करून प्रत्येक प्रभागासाठी (वॉर्डसाठी) सम प्रमाणात रूपये पन्नास लाख निधी विभागून खर्च करणे करिता ठेवणेत यावा. तो गटर्स व ड्रेनेज दुरूस्तीचे किरकोळ कामासाठी वापरण्यात यावा. "कंत्राटी पध्दतीने भुयारी गटर्स , नाले सफाई करणे" या लेखाशिर्षावर रूपये पांच लाख फक्त अशी तरतुद करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- नागापूर व केडगाव भागाकरिता एक एक वाचनालय करण्यांत यावे.

मा.श्री. कांबळे र.द.:- माहिती जनसंपर्क व ग्रंथालय विभागाकडील "जाहिरात खर्च"या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये पांच लाखाने वाढवून ती रूपये वीस लाख फक्त करण्यांत यावी.

--**--

**<u>ठराव :-</u>** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समितीकडे सादर झालेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन२००९-२०१० सालचे सुधारित व सन २०१०-२०११ सालचे मुळ अंदाजपत्रक (म.न.पा.स्कुल बोर्डासह) सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन२००९-२०१० सालचे सुधारित व सन२०१०-२०११ सालचे म.न.पा. स्कुल बोर्डासह चे मुळअंदाजपत्रकावर सभेमध्ये सखोल साधकबाधक सविस्तर चर्चा करणेत येवुन ही सभा पुढीलप्रमाणे शिफारस दुरूस्त्या करत आहे.

सन २०१०-२०११ सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चे प्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्या मध्ये दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा-खर्चाच्या रकमा कमी-जास्त करणेस नवीन लेखाशिर्ष तयार करून त्यावर तरतुद करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

त्याचप्रमाणे मा.आयुक्त साहेब यांनी मनोगतामध्ये व्यक्त केलेली कामे व सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाययोजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे. तसेच मा.सदस्यांनी सुचविलेली कामे अंदाजपत्रकातील त्यांना मंजूर करण्यांत आलेल्या स्वेच्छा निधी व वॉर्ड विकास निधी मधुन करणेत यावीत.

महानगरपालिका हद्दीमध्ये लावण्यांत येणा-या अनधिकृत जाहिरात बोर्डावर दंडासह जाहिरात कर वसुलीचे कडक धोरण अवलंबण्यांत यावे.

महानगर पालिकेमार्फत राबविण्यांत येणा-या "मिळकत धारक आरोग्य विमा योजना" या योजनेची माहिती नागरिकांना होईल.त्याकरिता सदर योजनेची प्रसिध्दी जाहिर रित्या करण्यांत यावी.

महानगरपालिकेचे कर्मचा-यांकरिता अपघात विमा योजना लागु करावी.

महानगरपालिकेचे रस्त्यावर बांधकाम मटेरिअल व रॅबीट इत्यादी टाकणा-यावर मटेरिअल जप्तीची व दंडात्मक कारवाई करण्यांत यावी.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे खर्च बाजूचे अंदाजपत्रकामधील लेखाशिर्षावर असणारी तरतुद ही लेखाशिर्षका अंतर्गत करण्यांत येणा-या कामांसाठीच वापरण्यात यावी. तसेच आकस्मीक खर्चासाठी केलेली तरतुद हि अचानक उद्‌भवना-या नैसर्गिक आपत्तीचे वेळीच खर्च करण्यांत यावी.

अंदाजपत्रकाच्या प्रति छापून घेवुन महानगरपालिका मा.सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरील प्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २००९-२०१० सालचे सुधारित व सन २०१०-२०११ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिकेचे स्कुल बोर्ड चे शेअर्ससह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

**( गाडे संजय बाबुराव पा.)**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**अहमदनगर महानगरपालिका.**

**सोबत :- सन २०१०-२०११ सालचे मुळ अंदाजपत्रकात केलेल्या बदलांचा तक्ता**

| अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर |
|---|
| मा. स्थायी समितीने शिफारस केलेले सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रक |
| |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१०)............................................५९५९०९३१/- |
| एकुण जमा.....................................................................१७७७२८११००/- |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा.............................................१८३६८७२०३१/- |
| एकुण खर्च.....................................................................१७८०८२००००/- |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०११).....................................५६०५२०३१/- |

| अ. नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू) | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतूद | मा. स्थायी समितीने केलेले बदल | | मा. स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ४४००००००० | ७५५००००० | | ५१५५००००० |
| २ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | १५००००००० | ३७२५७००० | | १८७२५७००० |
| | | | | | |
| | **एकुण** | **५९००००००००** | **११२७५७०००** | | **७०२७५७०००** |

| अ. नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतूद | मा. स्थायी समितीने केलेले बदल | | मा. स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नविन संगणक खरेदी (सर्व विभाग)- ई गव्हर्नन्स | २५००००० | ५००००० | | ३०००००० |
| २ | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र खर्च | ४००००० | १००००० | | ५००००० |
| ३ | म.न.पा. पदाधिकारी/अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण | ६००००० | | १००००० | ५००००० |
| ४ | नाका भाडे, बांधकाम, दुरुस्ती व स्थलांतर | १५००००० | | १०००००० | ५००००० |
| ५ | मालमत्ता पुर्नमुल्यांकन खर्च | १००० | ९९९००० | | १०००००० |
| ६ | जाहिरात खर्च | १५००००० | ५००००० | | २०००००० |
| ७ | संपर्क व प्रसिध्दी | २००००० | १००००० | | ३००००० |

| १ | २ | ३- | ४- | ५- | ६- |
|---|---|---|---|---|---|
| ८ | कर्मचारी अपघात विमा योजना | १००००० | १००००० | | २००००० |
| ९ | उनाड कुत्री बंदोबस्त करणे व दंशावर उपचार करणे | २५००००० | | ५००००० | २०००००० |
| १० | श्वान दंशावर लस खरेदी | ८००००० | | ३००००० | ५००००० |
| ११ | विद्युत साहित्य खरेदी | २०००००० | १५००००० | | ३५००००० |
| १२ | रसे व इमारतीवरील विज बिल | १७०००००० | | २०००००० | १५०००००० |
| १३ | १५० वॅट सोडियम व्हेपर पोल टाकणे /ऊर्जा बचत दिवे बसविणे | १०००००० | १५००००० | | २५००००० |
| १४ | नविन इले. पोल,स्ट्रीट लाईट स्पॅन फिटींग़ | १०००००० | १५००००० | | २५००००० |
| १५ | जुने इले. पोल हलविणे | १०००००० | ५००००० | | १५००००० |
| १६ | विद्युत बचत प्रक्ल्प राबविणे | ५००० | १९९५००० | | २०००००० |
| १७ | नविन वाहन खरेदी | ० | १००० | | १००० |
| १८ | कं टेनर, कॉम्पॅक्टर, डंपर प्लेसर इ. खरेदी | १००००० | ४००००० | | ५००००० |
| १९ | नविन जेटींग़ मशिन खरेदी | १८००००० | २००००० | | २०००००० |
| २० | हायप्रेशर युनिट खरेदी | १०००००० | ५००००० | | १५००००० |
| २१ | कंत्राटी पध्दतीने  भुयारी गटर्स, नाले सफाई करणे | १०००००० | | ५००००० | ५००००० |
| २२ | गमबुट, मास्क खरेदी | ३००००० | | २००००० | १००००० |
| २३ | म.न.पा. रक्तपेढ़ीसाठी औषधे व उपकरणे खरेदी | ४२००००० | | ५००००० | ३७००००० |
| २४ | जेंडर बजेट- महिला व बालकल्याण कार्यक्रम खर्च ५% | १०००००००‍ | | ५०००००० | ५०००००० |
| २५ | रक्तपेढी वैद्यकीय अधिकारी व तंत्रज्ञ यांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक करणे | ० | ५००००० | | ५००००० |
| २६ | मशिनरी खरेदी /दुरुस्ती (रक्तपेढी) | ० | ५०००० | | ५०००० |
| २७ | नविन शववाहिनी खरेदी करणे | ० | ५००००० | | ५००००० |
| २८ | जंतूनाशक द्रव्ये | १८००००० | | ८००००० | १०००००० |
| २९ | पिंजरे खरेदी (उंदिर/घुस प्रतिबंधक) | १०००० | ९०००० | | १००००० |
| ३० | वृक्षारोपण, वृक्ष संरक्षण व ट्री गार्ड खरेदी | २००००० | ८००००० | | १०००००० |
| ३१ | वृक्ष गणना  व  नंबर टाकणे | १००००० | १००००० | | २००००० |

| १ | २ | ३- | ४- | ५- | ६- |
|---|---|---|---|---|---|
| ३२ | रस्ते कॉक्रीटीकरण | २५००००० | १०००००० | | ३५००००० |
| ३३ | इमारत दुरुस्ती | ५००००० | १०९०००० | | १५९०००० |
| ३४ | म.न.पा. सभागृह नुतनीकरण | २००००० | | १९०००० | १०००० |
| ३५ | जेसीबी भाडयाने लावणे | २००००० | १००००० | | ३००००० |
| ३६ | प्रशासकीय इमारत सुरक्षा व्यवस्था | ७००००० | | ५००००० | २००००० |
| ३७ | शालेय क्रीडा स्पर्धा भरविणे | १००००० | १००००० | | २००००० |
| ३८ | क्रीडांगणे विकसीत करणे | १००००० | ९००००० | | १०००००० |
| ३९ | म.न.पा. वर्धापन दिन साजरा करणे | २५०००० | | १००००० | १५०००० |
| ४० | शहर वाहतूक सुधारणा | ७००००० | | ४००००० | ३००००० |
| ४१ | हत्यारे व अवजारे खरेदी | २००००० | २००००० | | ४००००० |
| ४२ | शिक्षण मंडळ वर्गणी | १५५००००० | | १०००००० | १४५००००० |
| ४३ | शालेय गणवेश खरेदी | ७००००० | | १५०००० | ५५०००० |
| ४४ | बेंच, फर्निचर खरेदी व दुरुस्ती | २५०००० | | २००००० | ५०००० |
| ४५ | ए. व्ही. रुम | १००००० | ५०००० | | १५०००० |
| ४६ | बालवाडी सेविका मानधन | १०८००० | | १८००० | ९०००० |
| ४७ | सदस्य मिटींग भत्ता / मानधन | ४३२००० | | ४००००० | ३२००० |
| ४८ | वाहन खर्च | २५०००० | | ६०००० | १९०००० |
| ४९ | कार्यालय/शाळा दुरुस्ती | १५०००० | ८५०००० | | १०००००० |
| ५० | म.न.पा. शिक्षण मंडळ शिष्यवृत्ती योजना | २००००० | | १५०००० | ५०००० |
| ५१ | टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे | १२०००००० | | ४०००००० | ८०००००० |
| ५२ | पाणी पुरवठा सर्वेक्षण करणे/ पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे हैड्रोलिक व्यवस्थापन करणे | १००००० | ९००००० | | १०००००० |
| ५३ | रस्ते डांबरीकण व  नुतनीकरण | ७५००००० | २५००००० | | १०००००००० |
| ५४ | रस्ते मजबुतीकरण | ७५००००० | | २५००००० | ५०००००० |
| ५५ | नविन प्रशासकीय इमारत | ५००००० | | ४००००० | १००००० |
| ५६ | उद्यान  विकास व तार कंपौंड | १०००००० | १०००००० | | २०००००० |
| ५७ | स्मशान भूमी सुधारणा व नविन स्मशान भूमी | १०००००० | २५००००० | | ३५००००० |
| ५८ | मा. सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी | १७५००००० | १०५००००० | | २८०००००० |

| १ | २ | ३- | ४- | ५- | ६- |
|---|---|---|---|---|---|
| ५९ | महापौर शहर विकास निधी | ० | २५०००००० | | २५०००००० |
| ६० | उपमहापौर शहर विकास निधी | ० | २५००००० | | २५००००० |
| ६१ | स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ० | २५००००० | | २५००००० |
| ६२ | प्रभाग समिती क्र. १ | ० | २००००० | | २००००० |
| ६३ | वॉर्ड विकास निधी | ० | ७०००००० | | ७०००००० |
| ६३ | नविन गटर | २५००००० | १०००००० | | ३५००००० |
| ६४ | शहरात  नविन पाईप लाईन टाकणे | ५०००००० | | २५००००० | २५००००० |
| ६५ | वाढीव हद्दीत नविन  पाईप लाईन  टाकणे | २५००००० | २५००००० | | ५०००००० |
| ६६ | पाण्याची टाकी बांधणे | १७००००० | | १६००००० | १००००० |
| | **एकुण** | **१३४५५६०००** | **१३७८२५०००** | **२५०६८०००** | **२४७३१३०००** |

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.